**जाहिरात क्रमांक :---------**

## जिल्हा परिषद, लातूर.
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
## (शालेय पोषण आहार योजना)

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत जिल्हा परिषद, लातूर-शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत रिक्त असणारी डेटा एन्ट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील १ वर्षाच्या कालावधीकरिता कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. व तद्नंतर काम समाधानकारक असल्यास एक दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देवून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरिता पुनर्नियुक्ती देण्यात येईल. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहित नमुन्यात -शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर येथे दिनांक -------- सायं. ५.०० वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून स्वीकारले जातील. 12-3-2021

| अ. क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | मासिक एकत्रित परिश्रमिक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | जिल्हास्तर : --<br>तालुकास्तर : ०३ | रु. १५,९००/- | १) किमान १२ वी पास<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.<br>३) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.<br>४) एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण |

१) **वयोमर्यादा : दि.३१/१२/२०२० अखेर वय वर्षे १८ पेक्षा कमी ३५ पेक्षा जास्त असू नये.**

२) **निवड पद्धती :**

**अ)** डाटा एन्ट्री ऑपरेटर्स पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास इ. १० वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इ. १२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. तसेच, एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला १० गुण बोनस देण्यात येतील.

**ब)** अनु. "अ" मध्ये विषद केल्याप्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परीक्षेकरिता एका पदासाठी गुणानुक्रमे १२ उमेदवार याप्रमाणे बोलावण्यात येईल. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग- ३० शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टायपिंग- ४० शब्द प्रति मिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून १०० गुण देण्यात येतील. सदर प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये किमान ५० गुण प्राप्त होणारे उमेदवार **"डेटा एन्ट्री ऑपरेटर"** या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

**क)** उमेदवारास संगणक परीक्षेमध्ये मिळालेले गुण (१०० पैकी) व अनु. क्र. "अ" प्रमाणे शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन एकूण गुण देण्यात येतील व यानुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्याप्रमाणे तेवढ्याच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

**ड)** सदर पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नाही.

**३) सूचना :**

३.१) उमेदवारांनी विहित नमुन्यात अलिकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट आकाराच्या फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटावर **"डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज"** असे नमूद करावे. उमेदवाराने अर्ज "सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर" यांचे नांवे सादर करावेत.

३.२) उमेदवाराचा नियुक्ती कालावधी एक वर्षाचा राहिल व दरवर्षी उमेदवाराचे काम समाधानकारक असल्यास नियमानुसार एक दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देवून पुनर्नियुक्ती देण्यात येईल.

३.३) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय, अनुभव इत्यादी संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात.

३.४) अर्जासोबत स्वतःचे पूर्ण नांव व पत्ता असलेला "४ X ६" आकाराचा असलेला रिकामा, रु. १०/- चे पोस्टाचे तिकिट लावलेला लिफाफा पाठविण्यात यावा.

३.५) अर्ज करण्याची अंतिम दिनांक 12-3-2021 असेल. यानंतर आलेले अर्ज स्वीकारे जाणार नाहीत.

३.६) नियुक्तीपूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहित नमुन्यात करारनामा (बंधपत्र) करुन घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपद्धती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास व जिल्हा निवड समितीस राहतील.

३.७) कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमुद केलेल्या एक वर्ष कालावधीनंतर आपोआप संपूष्टात येईल.

३.८) डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पद्धतीच्या कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

३.९) सदर पदांची भरती कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याने बिंदू नामावलीप्रमाणे पदे भरण्याची आवश्यकता नाही.

३.१०) अर्जदाराने रक्कम रु.500/- चा D.D. **शालेय पोषण आहार योजना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर** यांचे नांवे काढून अर्जासोबत जोडावा.

३.११) सदर परीक्षेस बसण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३.१२) परीक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

३.१३) सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, लातूर.

अध्यक्ष,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर

## जिल्हा परिषद, लातूर शिक्षण विभाग (प्राथमिक)
## शालेय पोषण आहार योजना - डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज-२०२०.
**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक : ------------- दिनांक : -------------**

प्रति,

सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर.

| उमेदवाराच्या अलिकडच्या काळातील राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकित केलेला पासपोर्ट साईज फोटो |
|---|

**विषय : शालेय पोषण आहार योजना सन २०२०-२१
डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज.**

१) उमेदवाराचे नांव : श्री./श्रीम. -----------------------------------------------------
(आडनांव) (स्वत:चे नांव) (वडिलांचे/पतीचे नांव)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------
-----------------------------------------------------
-----------------------------------------------------

३) जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) : -----------------------

४) वय (दिनांक २१/१२/२०२० रोजी) : -------- वर्ष ---------- महिने --------- दिवस

५) अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता :

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १० वी | | | | |
| २. | १२ वी | | | | |
| ३. | पदवी | | | | |
| ४. | मराठी टंकलेखन | | | | |
| ५. | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| ६. | एम.एस.सी.आय.टी. | | | | |

६) अनुभव :

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी (पासून - पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती-

१. ------------------------------------ २. --------------------------------------
३. ------------------------------------ ४. --------------------------------------
५. ------------------------------------ ६. --------------------------------------

**प्रतिज्ञापत्र**

प्रमाणित करतो/करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :
स्थळ :

(उमेदवाराचे पूर्ण नांव, स्वाक्षरी व मोबाईल क्र.)

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, लातूर